नवी मुंबईच्या पाणथळींवरील इमल्यांचे संकट दूर!

(पान १ वरून) महापालिकेच्या विकास आराखड्यात राज्य सरकारने पाणथळी कायम ठेवण्याची सूचना केली आहे. हा निर्णय घेत असताना या प्रस्तावावर पुन्हा हरकती, सूचना मागविण्याची मेख मात्र मारून ठेवली आहे. नवी मुंबईतील पामबीच मार्गावर नेरुळ, सीवूड परिसरातील खाडीकिनारी नैसर्गिकरीत्या पाणथळी निर्माण झाल्या आहेत. या पाणथळींमधील जैवविविधतेमुळे दरवर्षी हजारोंच्या संख्येने फ्लेमिंगो पक्षी हिवाळ्यात येथे स्थलांतर करतात. गेल्या काही वर्षांत तर हा परिसर फ्लेमिंगोंचा कायमस्वरूपी अधिवास बनला आहे. त्यामुळे नवी मुंबईला 'फ्लेमिंगो सिटी' अशी बिरुदावलीही देण्यात आली. असे असताना महापालिकेच्या नवीन विकास आराखड्यात या पाणथळींच्या जागी भूखंड दाखवून तेथे बांधकामांचे आरक्षण टाकण्यात आले होते. याबद्दल पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र नाराजी होती.

नैसर्गिकदृष्ट्या अतिशय समृद्ध असलेल्या ठाणे खाडीकिनाऱ्याच्या या परिसरात आलिशान गृहसंकुले उभारण्याच्या हालचाली एका बड्या विकासकाने चालवल्या होत्या. त्यासाठी राज्य सरकारमधील उच्चपदस्थ नेतेमंडळींच्या मार्फत पालिकेवर दबाव आणून विकास आराखड्यात या पाणथळीच नसल्याचे दाखवण्याचे प्रयत्न करण्यात आले. महापालिकेच्या प्रारूप विकास आराखड्यात पामबीच मार्गावरील खाडीकडील बाजूस असलेल्या या जागा 'पाणथळ' असल्याचे दाखविण्यात आले होते. नंतर मात्र, त्यात बदल करण्यात आला. हा अंतिम आराखडा राज्य सरकारच्या मान्यतेसाठी पाठवण्यात आला होता. याबाबतचे वृत्त सर्वप्रथम 'लोकसत्ता'ने दिले. त्यानंतर नवी मुंबईतील पर्यावरणप्रेमी नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली होती. वनमंत्री गणेश नाईक यांनीही या मुद्द्यावरून राज्य सरकार तसेच सिडकोला धारेवर धरले होते. अखेर विकास आराखडा अंतिम करत असताना पाणथळीच्या सर्व जागा कायम ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून पामबीच मार्गालगतचा खाडीकिनारा यामुळे सुरक्षित राहण्याची शक्यता आहे.

पालिका निवडणुकीच्या धास्तीने माघार?

पामबीच मार्गालगतचा हा परिसर फ्लेमिंगोंचा कायमस्वरूपी अधिवास बनला आहे. त्यामुळे ही नवी मुंबईची ओळख बनली असून आसपासच्या शहरांतून पर्यटक येथे फ्लेमिंगो पाहण्यासाठी येतात. तसेच अन्य पक्ष्यांचेही येथे वास्तव्य आहे. शहराच्या पर्यावरणाच्या दृष्टीनेही हा परिसर समृद्ध समजला जातो. असे असताना या पाणथळी वगळण्याचा घाट घातला गेला. वनमंत्री गणेश नाईक यांनी हा मुद्दा हातात घेऊन त्याचे खापर अप्रत्यक्षपणे एकनाथ शिंदे यांच्याकडे असलेल्या नगरविकास विभागावर फोडले होते. त्यामुळे या मुद्द्यावरून पालिका निवडणुकीत शिवसेना पक्षाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न होण्याचीही चर्चा होती. म्हणूनच हा निर्णय मागे घेण्यात आल्याचे बोलले जात आहे.

आराखड्यातील प्रस्तावांवर काट?

- महापालिकेच्या विकास आराखड्यानुसार पामबीच मार्गालगत असलेल्या दिल्ली पब्लिक स्कूललगतच्या नेरुळ सेक्टर ५२ (ए) भागातील पाणथळ क्षेत्र निवासी संकुलांसाठी खुले करण्यात आले होते.
- येथून काही अंतरावरील टी. एस. चाणक्य शिक्षणसंस्थेच्या मागील बाजूस 'पॉकेट ए-बी'म्हणून नोंद असलेले पाणथळ क्षेत्रही खुले करण्यात आले होते. त्याचवेळी चाणक्य संकुलालगतच्या रस्त्याची रुंदी १५ मीटरवरून ३० मीटर करण्याचाही आराखड्यात प्रस्ताव होता.
- या बदलानुसार अंमलबजावणी झाली असती तर येथील नैसर्गिक फ्लेमिंगो अधिवासही नष्ट होण्याची भीती होती.

वसई-विरारच्या माजी आयुक्तांना 'ईडी'चे समन्स

छाप्यामध्ये १.३३ कोटींची रक्कम जप्त

लोकसत्ता खास प्रतिनिधी

मुंबई : वसई-विरार महापालिकेचे माजी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या निवासस्थानावर छापा टाकल्यानंतर आता सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) त्यांना समन्स बजावले आहे. त्यांच्यासह एकूण सहा जणांना समन्स बजावल्याचे सूत्रांनी सांगितले. ईडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या माहितीला दुजोरा दिला. मंगळवारी पवार यांच्या निवासस्थानासह १२ ठिकाणी छापे टाकले. त्यात एक कोटी ३३ लाख रुपये व कागदपत्रे 'ईडी'ने जप्त केली.

वसई-विरार महापालिकेचे माजी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या निवासस्थानासह १२ ठिकाणी ईडीने मंगळवारी छापे टाकले. त्यावेळी नाशिक येथील त्यांच्या पुतण्याकडून एक कोटी ३३ लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली. या प्रकरणानंतर अधिक माहिती घेण्यासाठी ईडीने पवार यांच्यासह एकूण सहा जणांना समन्स बजावल्याची माहिती सूत्रांनी दिली.

पवार यांची मुंबई महानगर झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी बदली केली आहे.

मालमत्तांशी संबंधित कागदपत्रांचाही समावेश



ईडीने वसई-विरार परिसरात बेकायदा रहिवासी व व्यावसायिक इमारतींच्या बांधकामांप्रकरणी मोठी कारवाई हाती घेतली आहे. छाप्यांमध्ये नाशिक येथील पवार यांच्या नातेवाईकाच्या घरातून एक कोटी ३३ लाख रुपयांची रोकड जप्त केली. याशिवाय या कारवाईत मालमत्तांची कागदपत्रेही जप्त करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

कर्नाळा बँकेच्या खातेदारांना दिलासा

३८६ कोटींचा परतावा मिळण्याचा मार्ग मोकळा

लोकसत्ता खास प्रतिनिधी

मुंबई : कर्नाळा नागरी सहकारी बँकेत झालेल्या ५६० कोटी रुपयांच्या कथित गैरव्यवहाराप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) टाच आणलेली सुमारे ३८६ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता सक्षम प्राधिकरणाला (एमपीआयडी) सुपूर्द करण्यात आली. ही खातेदारांसाठी दिलासादायक बाब मानली जात आहे.

ईडीने दिलेल्या माहितीनुसार, आमदार विवेकानंद पाटील, तसेच अन्य अधिकाऱ्यांनी संगनमताने बँकेची फसवणूक करून निधी खासगी गुंतवणुकीसाठी वळवल्याचा आरोप आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी फेब्रुवारी, २०२० मध्ये गुन्हा दाखल केला होता. त्या आधारावर ईडीने याप्रकरणी बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) व १२ संचालकांसह ७५ आरोपींविरोधात गुन्हा नोंदवला होता. ईडीने जून २०२१ मध्ये विवेक पाटील यांना अटक केली होती. याप्रकरणी ईडीच्या तपासात आरोपींनी ६३ बनावट कर्जखाते उघडून बनावट कागदपत्रांच्या आधारे कर्ज मंजूर केले आणि आरबीआयच्या नियमांचे उल्लंघन करून सुमारे ५६० कोटी रुपये अपहार केला, असा आरोप आहे.

ही रक्कम विवेक पाटील व त्यांच्या नातेवाईकांच्या नियंत्रणाखालील विविध संस्थांमध्ये वळवण्यात आली. या निधीचा वापर करून रायगड जिल्ह्यात विविध ठिकाणी स्थावर मालमत्ता खरेदी करण्यात आली, अशी माहिती ईडीकडून देण्यात आली.

खड्ड्यामुळे अपघातात युवकाचा मृत्यू

ठाणे : भिवंडी-वाडा मार्गावरील खड्ड्यामुळे एका १७ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी उघडकीस आली. यश मोरे असे मुलाचे नाव असून याप्रकरणी भिवंडी तालुका पोलीस ठाण्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते आणि कंत्राटदारावर गुन्हा दाखल झाला आहे. हा अपघात २० जुलै रोजी झाला होता, परंतु बुधवारी यशचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

भिवंडी येथील मडक्याचा पाडा परिसरात यश मोरे हा राहत होता. २० जुलैला तो मित्रासह व्यायामशाळेत जात असताना त्याची दुचाकी खड्ड्यामध्ये आदळली. या घटनेत यश आणि त्याचा मित्र गंभीर जखमी झाले. त्यांना ठाण्यातील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. अखेर बुधवारी सकाळी यशचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळाल्यानंतर यशच्या कुटुंबीयांनी आणि स्थानिकांनी आंदोलन केले.

अपघातात जबाबदार असलेले कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल होत नाही तोपर्यंत आम्ही मृतदेह ताब्यात घेणार नाहीत, असा पवित्रा यशच्या नातेवाईकांनी घेतला होता.

'ईडी'कडून अविनाश भोसले यांची मालमत्ता सोडविण्याची विनंती

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : पुणेस्थित बांधकाम व्यावसायिक अविनाश भोसले यांना डिसेंबर २०२२ मध्ये विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्यानंतर आता सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) भोसले यांच्या टाच आणलेल्या मालमत्तांवरील निर्बंध हटवण्याबाबतची विनंती राज्य शासनाच्या संबंधित विभागाला केली आहे.

सक्तवसुली संचालनालय मुंबई परिमंडळ २ कार्यालयाने १२ जून रोजी पुणे येथील नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रकांना पत्र लिहून एआरए मालमत्ता आणि अविनाश भोसले यांच्याशी संबंधित प्रकरणात टाच आणण्यात आलेल्या मालमत्तांवरील सर्व निर्बंध हटवण्याची विनंती रजिस्ट्रेशन अँड कंट्रोलर ऑफ स्टॅम्प विभागाच्या महानिरीक्षकांना केली आहे. याबाबत १२ जून रोजी ईडीकडून महानिरीक्षकांना अधिकृत पत्र पाठवण्यात आले आहे.

गणेशोत्सवासाठी अतिरिक्त ४४ विशेष रेल्वेगाड्या

मुंबई : मुंबई महानगरातून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी मध्य आणि कोकण रेल्वे मार्गावरून विशेष रेल्वेगाड्या चालविण्यात येणार आहेत. मध्य रेल्वेने याआधी २५० गणपती विशेष रेल्वेगाड्या चालवण्याची घोषणा केली आहे. याव्यतिरिक्त आता अतिरिक्त ४४ विशेष रेल्वेगाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच दिवा-चिपळूण-दिवा मेमू दैनिक अनारक्षित विशेष रेल्वेगाडीचा विस्तार आणखी दोन सेवा वाढवून केला जाणार आहे. त्यामुळे गणपती विशेष रेल्वेगाड्यांची संख्या २९६ वर पोहोचली आहे.

गाडी क्रमांक ०११३१ द्वैसाप्ताहिक विशेष रेल्वेगाडी प्रत्येक गुरुवारी आणि रविवारी २८ आणि ३१ ऑगस्ट, ४ आणि ७ सप्टेंबर रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सकाळी ८.४५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी रात्री १०.२० वाजता सावंतवाडी रोड येथे पोहोचेल.

या रेल्वेगाडीच्या एकूण चार फेऱ्या चालविण्यात येतील. तर, गाडी क्रमांक ०११३२ द्वैसाप्ताहिक विशेष रेल्वेगाडी प्रत्येक गुरुवारी आणि रविवारी २८ आणि ३१ ऑगस्ट, ४ आणि ७ सप्टेंबर रोजी सावंतवाडी रोड येथून रात्री ११.२० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १२.३० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. या गाडीच्या एकूण चार फेऱ्या चालविण्यात येतील.

'टिस'च्या कुलगुरूपदी बद्री तिवारी यांची नियुक्ती

मुंबई : टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (टिस) मुंबईच्या कुलगुरूपदी उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथील गोविंद वल्लभ पंत सोशल सायन्सेस इन्स्टिट्यूटचे प्राध्यापक आणि संचालक प्रा. बद्री नारायण तिवारी यांची नियुक्ती झाली आहे.

'टिस' मुंबईच्या मेमोरँडम ऑफ असोसिएशन आणि नियमांच्या कलम २४ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून आणि मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीच्या मान्यतेने, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाद्वारे उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथील गोविंद वल्लभ पंत सोशल सायन्सेस इन्स्टिट्यूटचे प्राध्यापक आणि संचालक प्रा. बद्री नारायण तिवारी यांची 'टिस'च्या कुलगुरूपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तिवारी हे पदाचा कार्यभार स्वीकारल्याच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी किंवा पुढील आदेश येईपर्यंत कुलगुरूपदी असतील, असे सरकारकडून जाहीर करण्यात आले आहे.

The Oberoi Group

TENDER NOTICE

Contact Number : 90828 43755

Online Tenders are invited for providing and carrying out individual repairs and maintenance jobs for the following categories / head of jobs to **The Oberoi Mumbai, Trident Nariman Point Mumbai 400021, Oberoi Flight Services Mumbai 400099, Trident Bandra Kurla and The Bay Club, Mumbai 400051,** as per our specifications and scope, for the period mentioned below :

1st September 2025 to 31st August 2027

1. Civil and Interior
2. Plumbing
3. Mechanical
4. Painting and Polishing
5. Electrical
6. Specialise / Misc Jobs
7. Carpentry
8. HVAC

Tender forms will be sent electronically on registered email ID after payment of Rs. 5,000/- (non-refundable), at The Trident Nariman Point Mumbai 400021, on all working days between **11am to 4pm from 31st July to 7th August 2025.** The Management reserves the right to accept or reject any tender form in part or whole without assigning any reasons whatsoever.

Last date for Submission of Tender is 8th August, 2025

तिरुमला तिरुपति देवस्थानम्स, तिरुपति
विपणन विभाग

ई-प्रॉकरमेंट निविदा सूचना

विपणन विभाग, तिरुमला तिरुपति देवस्थानम्स यांना (१) २,७०,००० किग्रॅ बेदाण्यांचे प्रापण व पुरवठा करण्याकरिता ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा सूचना आणि निविदेचे तपशील यासाठी वेबसाइट http://www.tirumala.org आणि https://tender.apeprocurement.gov.in येथे भेट द्या. **अधिक माहितीकरिता दूरध्वनी क्रमांक : ०८७७-२२६४०७९, २२६४५५५, फॅक्स नंबर : ०८७७-२२६४५५४ वर संपर्क साधा.**

TTD-40021/10/2025-PRO SEC (Adv.NO.149) - Date : 30.07.2025 **कार्यकारी अधिकारी**

Ministry of Culture Government of India

SCIENCE CITY
(A unit of National Council of Science Museums)
Ministry of Culture, Govt. of India
J.B.S. Haldane Avenue, Kolkata – 700046

Advertisement No. 05/2025

NOTICE INVITING E-TENDER

NO. SCCY-15014/30(442)/2025

Digitally signed E-tenders are invited for the work of Structural Strengthening of the Main Auditorium Dome at Science City, Kolkata at an estimated basic cost of ₹ 966.37 Lakhs.

Interested agencies may visit **http://eprocure.gov.in/eprocure/app** and search for tender **ID: 2025_NCSM_870753_1** for details of this e-tender. Civil section of this office may be contacted (033-22854343/328) for site visit.

DEAR GOVERNMENT LOTTERY
PUNJAB STATE LOTTERIES
पंजाब स्टेट डियर 200 मंथली लॉटरी
2 दिवस बाकी
विजेत्यासाठी प्रथम पारितोषिक बक्षिस रक्कम
₹1.50 करोड हमीपात्र
किंमत ₹ 200/-
इतरही अनेक आकर्षक बक्षीसे
DRAW ON 02.08.2025 8PM ONWARDS
LIVE STREAMING
Contact for Tickets :
ARE YOU THE NEXT CROREPATI?
TICKETS ARE AVAILABLE AT ALL LOTTERY COUNTERS

AMALNER : Vikas lottery & Gen. store : 8999612300 | **AHILYANAGAR :** Lucky lottery - 9423792145, Tulsi Lottery Agency - 9921198992 | **ANDHERI :** Megastar Distributor - 9967250008 **AMARAVATI :** New Hindustan Lottery - 7507867972 | **BORIWALI :** Diamond Corporation - 8657436773 | **BHAYANDER :** Balaji Sankari Agency - 9833213081 | **CHANDRAPUR :** Mahalaxmi Agency - 94221 36124/7558215696 | **DADAR :** Shree Ganesh Enterprises - 9870017798, Shree Siddhi Samarth Agency - 93261 96320, Ambika Lottery - 70457 19586, Shree Enterprise - 8422996345 | **DHULE :** Agarwal Lottery Agency - 9422706933 / 8766776900 | **GOREGAON :** Vishesh Distributers - 7900123332, Lambodar Enterprises - 9819224257, Multistar Distributor - 9930425378 | **GONDIA :** R.K. Lottery Mandi - 9325116868 | **GIRGAON :** Trimurti Lottery Agency - 9773373267, B.V. Kothavale - 9820629401| **ICHALKARANJI :** Maharaja Associates- 9028485789, Maharaja LotteryCentre-9764662643/ 9158729426 | **JALGAON :** Vyas Agency - 9890056854, Baheti Lottery - 9420389239 | **KOLHAPUR :** Mahavir Lottery Agency - 9822248473, 7066275145 | **KALYAN :** Prince Lottery - 9819574813 | **KALBADEVI :** Mewad Agency - 9833253514 | **KHAMGAON :** Matoshree Enterprises - 9922813194 | **MUMBAI :** Prince Agency - 9833748152 | **NERUL :** Shree Ganesh Krupa Agency - 9920116957 | **NAGPUR :** Lottery Bhandar - 9764688000, Balaji Marketing - 9371034883, Siraj Enterprises - 9822472123 | **NANDED :** Jagdamba Lottery Centre - 8956486986 , Prasad Enterprises - 9421908570, Shree Sai Krupa Lottery Agency - 9822767566, | **NASHIK :** Chirag Enterprises - 9168199999 | **SAMBHAJI NAGAR :** Rukmini Enterprises - 9822899520/8007059111, Komal Agency - 9370224810 | **SOLAPUR :** Barad Lottery Agency - 9420545869/9850501313 | **PANVEL :** Phatak Enterprises - 9167552882 | **PUNE :** Shri Gurudev Datta Lot. Agency - 9518591612, Parihar Enterprises - 9422517486, Kamal Agency - 830492061, Amit Lottery Agency - 9422087688 | **SANGLI :** Kishor M Shah - 8055204763 / 552529044 | **SATARA :** Samrat Agency - 8805277966 | **YAWATMAL :** New Jai ambe Lottery Bhandar - 9421844726

अधिक जानकारी के लिए कॉल करें (टोल फ्री) - 1800 266 0088
Mumbai - 7845816714 / 8754562382 / 7845827316 / 7845827314 / 8928588642 /7397776862 /9372275063
Sales Executive - Pune - 7845523543, Solapur - 8805060191, Kolhapur - 8010103915 / 9922431881, Amravati - 7498162774, Nagpur - 9922090691 / 7845819432/ 7845827259

NATIONAL SILK EXPO
Direct Weavers Exhibition & Sale
Wedding & Festival Special
31 July to 4 Aug.
ADITYA BANQUETS - THANE (W)
In side Ashar IT Park Gate No. 3, Wagle Street, Road No. 16z, Thane West
150+ certified weavers & best designers from all over India
Authentic & pure silk & cotton saree only at weavers price from all over India
All latest variety & new design
Silk & Cotton Saree | Designer Wear | Ethnic Wear
Kurti & Dresses | Fashion Jewellery | Handcrafted Textiles
UP TO 50% DISCOUNT BY WEAVERS
Orgd. By: G.H.V.S. R/o By: Ministry of Textiles Govt. of India
M: 9412258826 | Entry Free | All UPI Online / Debit & Credit Cards Accepted

Prathibha Biotech Private Limited
#5-36/249, Plot No.148, 1st Floor, Mythri Nagar, Kukatpally, Hyderabad - 72. Telangana State. Phone: 040 2372 0329. Email: prathibha_biotech@yahoo.co.in

अधसूचना

कृषी आणि सहकार विभाग व शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार, कृषी मंत्रालय यांच्या आदेश क्र. S.O. 2900(E) दिनांक 24-10-2015 व त्यातील सुधारणा दिनांक 30-12-2017 अन्वये प्रतिभा बायोटेक प्रा. लि. ही कंपनी पुढीलप्रमाणे नवीन 100% पाण्यात विद्रव्य NPK खते व सस्पेन्शन खते बाजारात आणण्याचा मानस अधिसूचित करते:

1. NPK 23-15-6 (टेरा – TERA)
2. NPK 6-5-32 (लॉरा – LAURA)
3. NPK 15-22-10 (फ्लोरा – FLORA)
4. NPK 15-10-25 (ब्राव्हो – BRAVO)
5. NPK 6-0-18 (कार्पोस – KARPOS)

वरील पाण्यात 100% विद्राव्य खतांचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत: NPK 23-15-6 (+2% Mg + 5% S + 1% Zn + 1% Mn + 1% Fe) (W/W%) NPK 6-5-32 (+8% S + 2% B + 3% MgO + 1% Cu) (W/W%) NPK 15-22-10 (+6% S + 2% B + 1% Cu) (W/W%) NPK 15-10-25 (एकूण नायट्रोजन N – 15%, एकूण फॉस्फरस P – 10%, एकूण पोटॅशियम K – 25%) NPK 6-0-18 (+5% Ca + 2% Mg + 0.8% B).

आम्ही खात्रीपूर्वक सांगतो की, वरील अधिसूचनेत नमूद केलेल्या सर्व प्रक्रिया आणि अटींचे पालन केले जाईल.

आपला नम्र,
प्रतिभा बायोटेक प्रा. लि.
व्यवस्थापकीय संचालक

इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन लिमिटेड
IRCTC
अयोध्या - प्रयागराज सह काशी विश्वनाथ ज्योतिर्लिंग यात्रा
2 एसी चार्टर्ड स्पेशल कोच द्वारे (दादर पासून)
त्वरा करा! लिमिटेड सीट्स उपलब्ध
पॅकेजची किंमत: ₹ 36,100/-*
प्रति व्यक्ती पासून सुरुवात
कालावधी: 08 रात्री/09 दिवस
प्रस्थानची तारीख: 14.08.2025
भेटीचे ठिकाण
वाराणसी, सारनाथ, अयोध्या, चित्रकूट, प्रयागराज
पॅकेजमध्ये समावेश 1) कन्फर्म रेल्वे तिकीट 2) बस सेवा 3) जेवण* 4) हॉटेल 5) मार्गदर्शक 6) विमा 7) जीएसटी
Call/SMS/WhatsApp "WMR 188" to : 8287931886
*अटी आणि शर्ती लागू.
पत्ता : आयआरसीटीसी, पर्यटन कार्यालय, तिसरा मजला, फोर्ब्स बिल्डिंग, चरणजित राय मार्ग, फोर्ट, मुंबई, महाराष्ट्र 400001
ऑनलाइन बुकिंगसाठी www.irctctourism.com वर लॉग ऑन करा किंवा तुम्ही आयआरसीटीसीच्या अधिकृत एजंट मार्फतही बुकिंग करू शकता

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई-मेल: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: www.mcxccl.com

३० जून २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिक अलेखापरीक्षित आर्थिक निष्कर्षांचे सार

(₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही			संपलेले वर्ष
	३० जून, २०२५ अलेखापरीक्षित	३१ मार्च, २०२५ लेखापरीक्षित	३० जून, २०२४ अलेखापरीक्षित	३१ मार्च, २०२५ लेखापरीक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न	७,०५१	६,००७	५,४३४	२३,८९७
२. कालावधीकरिता निव्वळ नफा (कर, अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींपूर्वी)	४,६९३	३,२८१	३,०२४	१४,३३६
३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींनंतर)	४,६९३	३,२८१	३,०२४	१४,३३६
४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींनंतर)	४,६९३	३,२९२	३,०२४	१४,३२७
५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	४,६६३	३,२९०	३,०१३	१४,२९७
६. समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	–	–	–	(३,९८६)
८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी)*				
मूलभूत (₹)	१.९६	१.३७	१.२६	५.९७
सौमिकृत (₹)	१.९६	१.३७	१.२६	५.९७

** अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.*

नोंद:

१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.
२. वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून केले गेले आहे आणि दिनांक ३० जुलै २०२५ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

संपूर्ण वित्तीय निष्कर्ष पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा.
किंवा https://www.mcxccl.com/disclosures/financial-results ला भेट द्या.

स्थळ: मुंबई
दिनांक: ३० जुलै २०२५

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
नरेंद्र कुमार अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी